# फिनोलेक्सतर्फे ससूनला दोन कोटींची उपकरणे; मंगळवारी उद्‌घाटन

**फिनोलेक्स** इंडस्ट्रिज आणि मुकुल माधव फौंडेशनतर्फे ससून सर्वोपचार रुग्णालयाला दोन कोटी रुपयांच्या अर्थसाहाय्यातून अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे देण्यात आली आहेत. येत्या १६ एप्रिलला नवजात शिशू अतिदक्षता विभागाच्या (एनआयसीयू) दुसऱ्या, तर एंडोस्कोपी युनिटच्या पहिल्या वर्धापनदिनाच्या निमित्ताने या अद्ययावत यंत्रणेचे उद्‌घाटन होणार आहे. एंडोस्कोपी युनिट आणि एनआयसीयू या विभागात ही अद्ययावत यंत्रणा बसविण्यात येत आहे. एंडोस्कोपी युनिटमध्ये किरणांपासून बचावासाठी अल्ट्रा साउंड विथ हेड प्रोटेक्शन, थायरॉइड शिल्ड, ओजिडी स्कोप आदी उपकरणांचा, तर एनआयसीयूमध्ये क्रिटिकल, अत्याधुनिक सेंट्रल एअर प्रेशर, दोन, सिपाप, ब्लड गॅस ॲनालायझर, ब्रेन ॲनालायझर या उपकरणांचा समावेश आहे. मुकुल माधव फौंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया म्हणाल्या, समाजाला चांगल्या आरोग्य सुविधा अल्पदरात उपलब्ध व्हाव्यात, यासाठी प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. या उपक्रमांमुळे 'ससून फॉर कॉमन मॅन' ही संकल्पना प्रत्यक्षात येत असल्याचे ससूनचे माजी अधिष्ठाता डॉ. अजय चंदनवाले यांनी सांगितले.